**ठळक बातम्या**

- ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांच्यासह ४ मान्यवरांची राष्ट्रपतींकडून राज्यसभेवर नियुक्ती

- बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या खतांबाबत त्वरित कडक कारवाई करण्याचे केंद्र सरकारचे सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देश

- लोकाभिमुख आणि ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करुन न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची व्यवस्था मजबूत करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

- भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांचा परतीचा प्रवास उद्या सुरु होणार

**आणि**

- राज्यात पुढचा आठवडा पावसाचा

**<><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांची राज्यसभेसाठी सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. निकम यांच्यासह समाजसेवक सी. सदानंदन मास्टर, माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला, इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. मीनाक्षी जैन यांचीही नियुक्ती झाल्याची अधिसूचना गृह मंत्रालयानं आज जारी केली. संविधानाच्या अनुच्छेद ८० अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करत राष्ट्रपतींनी ही नियुक्ती केली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या चारही मान्यवरांचं समाजमाध्यमावरून अभिनंदन केलं आहे. या नियुक्तीबद्दल प्रतिक्रिया देताना उज्जवल निकम म्हणाले….

**…. होल्ड- बाईट- उज्जवल निकम- -**

**<><><><>**

बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या खतांबाबत सर्व राज्य तसंच केंद्रशासित प्रदेशांनी त्वरित कडक कारवाई करावी असे निर्देश केंद्र सरकारनं दिले आहेत. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी सर्व मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे हे निर्देश दिले आहेत.

देशभरात बनावट खतांचं वितरण, खतांचा काळा बाजार तसंच, खतांच्या गोण्यांवर खोटी लेबलं लावण्यासारख्या अवैध गोष्टींना आळा घालायच्या उद्देशानं हे पत्र कृषीमंत्र्यांनी लिहिलं आहे. कृषीक्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात स्थैर्य यावं, याकरता त्यांना उत्तम दर्जाची खतं योग्य वेळी आणि रास्त भावात मिळणं गरजेचं आहे, असं चौहान यांनी म्हटलं आहे. त्यामुळे खतांचा पुरेसा साठा जागोजागी आणि गरजेच्या ठिकाणी उपलब्ध करून देणं ही राज्य सरकारांची जबाबदारी असल्याचं त्यांनी सांगितलं आहे. याकरता दोषी असलेल्यांचे खतवितरण परवाने रद्द करून राज्य सरकारांनी गुन्हे दाखल करावेत, असं चौहान यांनी म्हटलं आहे.

<><><><>

तंत्रज्ञान, सायबर आणि फसवणुकीचे वाढते गुन्हे लक्षात घेत येत्या काळात लोकाभिमुख आणि ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करुन न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची व्यवस्था आणखी मजबूत करण्यात येईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हटलं आहे. नागपूरमधल्या धंतोली इथं प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचं भूमिपूजन आज मुख्यमंत्र्याच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्रात देशातली सर्वात अत्याधुनिक सायबर न्यायसहायक वैज्ञानिक व्यवस्था निर्माण करण्यात आली असून फिरत्या न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा उभारल्या जात आहेत, असंही त्यांनी सांगितलं. मुख्यमंत्र्यांनी या कार्यक्रमात ऑनलाईन पद्धतीनं गृह विभागाच्या तीन नवीन प्रकल्पांचं लोकार्पणही केलं.

<><><><>

ऑपरेशन सिंदूर दरम्यान स्वदेशात निर्मित ब्राह्मोस क्षेपणास्त्रानं केलेल्या उल्लेखनीय कामगिरीनंतर परदेशात या क्षेपणास्त्राची मागणी वाढली असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज लखनौ इथं आयोजित कार्यक्रमात बोलत होते. जगभरातल्या १४ देशांनी ब्राह्मोसची चौकशी केली असून लखनौ इथूनही ही क्षेपणास्त्र त्या देशात रवाना केली जाणार आहेत, असंही त्यांनी सांगितलं. यामुळे उत्तर प्रदेशात रोजगार निर्मितीत वाढ होईल, असंही ते म्हणाले.

<><><><>

रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी १५ हजार रेल्वे इंजिनं आणि रेल्वे गाड्यांच्या ७४ हजार डब्यांमध्ये सीसीटीव्ही लावण्याचा निर्णय रेल्वे मंत्रालयानं घेतला आहे. रेल्वे इंजिन आणि गाड्यांमध्ये सीसीटीव्ही लावण्याच्या प्रक्रियेचा केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंह बिट्टू यांनी आज आढावा घेतला. रेल्वे डब्यांमध्ये कॅमेरे लावल्यानं प्रवाशांना अधिक सुरक्षितपणे प्रवास करता येणार आहे. प्रवाशांचा खासगीपणा जपला जावा, यासाठी हे सीसीटीव्ही  डब्यांच्या दरवाजाजवळ लावले जाणार आहेत.

प्रत्येक कोचमध्ये चार डोम पद्धतीचे सीसीटीव्ही कॅमेरे आणि रेल्वे इंजिनांमध्ये सहा सीसीटीव्ही कॅमेरे लावले जाणार आहेत. हे सर्व कॅमेरे उच्चक्षमतेचे आणि अत्याधुनिक असल्याची माहिती केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी दिली. या कॅमेऱ्यांमध्ये एआय तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याच्या सूचनाही अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

**<><><>**

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्या तोंडाला सोलापूर जिल्ह्यात अक्कलकोट इथं आज काळं फासलं. गायकवाड यांनी स्वामी समर्थांबद्दल अपशब्द वापरल्याचा आरोप करत शिवधर्म फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी हे कृत्य केलं. तसंच संभाजी ब्रिगेडनं आपल्या संघटनेच्या नावात छत्रपती संभाजी महाराजांचा एकेरी उल्लेख तातडीनं थांबवावा, अन्यथा तीव्र आंदोलन केलं जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

**<><><>**

भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांचा परतीचा प्रवास उद्या सुरु होईल. ग्रुप कॅप्टन शुक्ला यांच्यासह आणखी ३ अंतराळवीरांना घेऊन ॲक्सियॉम - फोर हे अंतराळ यान आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरुन भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी साडेचार वाजता रवाना होईल. हे यान येत्या मंगळवारी दुपारी तीनच्या सुमारास पृथ्वीवर उतरेल. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी समाजमाध्यमावर ही माहिती दिली. शुभांशु शुक्ला यांनी भारतासाठी अंतराळात एकूण सात प्रयोग केले आहेत.

**<><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी  येत्या २७ जुलैला सकाळी अकरा वाजता आकाशवाणीच्या ‘मन की बात’ कार्यक्रमातून जनतेसमोर आपले विचार मांडणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १२४ वा भाग असणार आहे. हा कार्यक्रम आकाशवाणीसह दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून

प्रसारित होईल. या कार्यक्रमासाठी महत्त्वाच्या मुद्द्यांबाबत जनतेच्या सूचना मागवण्यात येत असून येत्या शुक्रवारी दिनांक २५ जुलै २०२५ पर्यंत नागरिकांना आपलं मनोगत माय जी ओ व्ही डॉट इन संकेतस्थळ तसंच नि:शुल्क दूरध्वनी क्रमांक एक आठ शून्य शून्य - अकरा - सात आठ शून्य शून्य यावरही  व्यक्त करता येईल.

**<><><><>**

गेल्या दहा वर्षांमध्ये देशातल्या एकूण प्रत्यक्ष कर संकलनात २७४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. अर्थ मंत्रालयाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २०१३-१४ ते २०२४-२५ या कालावधीत कर विभागानं दिलेल्या परताव्याच्या रकमा ४७४ टक्क्यांनी वाढल्या आहेत आणि करदात्यांची संख्या १३३ टक्क्यांनी वाढली आहे.

२०१३ मध्ये कर परतावा देण्यास सरासरी ९३ दिवस लागायचे, तेच आता २०२४ मध्ये केवळ १७ दिवसांवर आले आहेत. गेल्या दशकात कर प्रशासनात झालेला हा आमूलाग्र बदल डिजिटल पायाभूत सुविधांच्या अंगीकारामुळे शक्य झाला आहे. यात पूर्णपणे ऑनलाइन फाइलिंग, 'फेसलेस' मूल्यांकन अशा उपायांचा समावेश आहे, यामुळे आयकर विवरणपत्रांशी संबंधित प्रक्रिया जलद आणि अचूकपणे करणं सोपं जातं.

**<><><><>**

विम्बल्डनमध्ये पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात आज अग्रमानांकित यानिक सिनर याच्यासमोर दोनवेळा अजिंक्यपद विजेता कार्लोस अल्काराज याचं आव्हान असेल. भारतीय प्रमाणवेळेनुसार हा सामना रात्री साडेआठ वाजता सुरू होईल. अल्काराजनं उपांत्य फेरीत टेलर फ्रिट्झ याचा पराभव केला होता, तर सिनर यानं नोव्हाक जोकोविचवर थेट सेट्समध्ये मात केली होती. महिला दुहेरीत सू वे शे आणि येलेना ऑस्टापेंको या जोडीचा सामना वेरोनिका कुदेरमेतोव्हा आणि एलीज मर्टन्स या जोडीशी सुरू आहे.

काल महिला एकेरीच्या अंतिम फेरीत इगा श्वियांतेक हिनं अमांडा अनिसिमोव्हा हिच्यावर ६-०, ६-० अशी सहज मात करून पहिलं विम्बल्डन जेतेपद पटकावलं. तिचं हे सहावं ग्रँडस्लॅम जेतेपद आहे.

**<><><><>**

राज्य शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क विभागातले अधिकारी संजय देशमुख याचं आज हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे जनसंपर्क अधिकारी म्हणून ते काम करत होते.

**<><><><>**

गेल्या २४ तासात कोकणात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. १९ जुलै पर्यंत राज्याच्या चारही विभागांमध्ये कमी-अधिक प्रमाणात पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><>//**